# देशात सर्वाधिक मुख कर्करुग्ण विदर्भात

## डॉ. विनय हजारे यांची माहिती

प्रतिनिधी, नागपूर

**खर्रा, गुटख्यासह** तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनाने तोंडाचा कर्करोग वाढत आहे. या आजाराचे देशात सर्वाधिक रुग्ण हे विदर्भात आढळतात, अशी माहिती शासकीय दंत महाविद्यालयाचे माजी अधिष्ठाता व ज्येष्ठ दंतरोग तज्ज्ञ डॉ. विनय हजारे यांनी दिली.

इंडोको रेमेडीस लि. मुंबई स्थित औषध कंपनीने कर्करोगाला आळा घालण्यासाठी सर्वत्र जनजागृती अभियान राबवण्याचे निश्चित केले आहे. त्याची माहिती देण्यासाठी बुधवारी प्रेस क्लब येथे आयोजित पत्रपरिषदेत ते बोलत होते.

डॉ. हजारे म्हणाले, कर्करोगग्रस्तांमध्ये तरुणांची संख्या मोठी असून ही चिंतेची बाब आहे. जनजागृतीतूनच या आजारावर नियंत्रण शक्य आहे. मुख कर्करोग हा तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन किंवा धूम्रपानामुळे होवू शकतो. सुपारी चघळल्यानेही तो होतो. शासकीय दंत महाविद्यालयातील अभ्यासानुसार पूर्वी एक हजारात २.६ रुग्ण ओरल फायब्रोसीसचे आढळत होते. पुढे ही संख्या वाढून ६.४१ वर गेली. दंत महाविद्यालयात येणाऱ्यांपैकी एक ते पाच टक्के रुग्णांच्या तोंडाला पांढरा चट्टा, सुमारे १५ टक्के रुग्णांमध्ये लाल चट्टा तर २५ टक्के रुग्णांच्या तोंडाला ओरल फायब्रोसेस असल्याचे आढळते. ही कर्करोग होण्याची लक्षणे आहेत. वेळीच या व्यक्तीच्या आजाराचे निदान व उपचार झाल्यास त्याला कॅन्सरपासून वाचवता येते. त्यासाठी तपासणीबाबत जनजागृती महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले. दंत शल्यचिकित्सक डॉ. प्रणव इंगोले म्हणाले, तोंडाच्या कर्करोगाचे पहिल्या टप्प्यात निदान होऊन उपचार झाल्यास खर्च कमी येतो, परंतु आपल्याकडे साधारणतः तिसऱ्या किंवा चवथ्या पायरीवरच रुग्णाच्या आजाराचे निदान होते. त्यामुळे या रुग्णाला जास्त वेदना सहन कराव्या लागतात. हा रुग्ण पूर्णपणे बरा होऊ शकत नाही. इंडोको रेमेडीसचे समीर दैनी म्हणाले, आमच्या कंपनीतर्फे डॉक्टरांना मुखाशी संबंधित कर्करोगावर प्रशिक्षित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी स्थानिक डॉक्टरांची मदत घेतली जात आहे. सोबत जनजागृतीसाठी कंपनी विविध उपक्रम राबवणार आहे.




इंडोको रेमेडीजच्या पत्रपरिषदेत बोलताना डॉ. विनय हजारे, सोबत डॉ. प्रणव इंगोले, समीर दैनी.

लोकसत्ता Thu, 19 July 2018
epaper.loksatta.com/c/30490987